**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री. रंगनाथ गणपतराव भोसले
रा.कळस, ता. इंदापूर, जि. पुणे
अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कळस, ता.इंदापूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६६१ / पुणे + १६ तक्रार |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६.११.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. रंगनाथ गणपतराव भोसले<br>रा.कळस, ता. इंदापूर, जि. पुणे |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर,<br>जि.पुणे श्री. आर. एम. साळुंके |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कळस, ता.इंदापूर, जि. पुणे<br>श्री. व्ही. एस. चांदगुडे |
| | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

ग्रामपंचायत कळस यांच्याकडील सन १९८१ मधील इतिवृत्ताची प्रत मागणारा आपला अर्ज जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, कळस ग्रामपंचायत, ता. इंदापूर यांनी स्वीकारला नाही. टपालाने पाठविलेला अर्जही परत आला व त्यानंतर संबंधित अभिलेख उपलब्ध नसल्याचे आपल्याला कळविले. त्याच्या आधीचे अभिलेख उपलब्ध असूनही नंतरचे अभिलेख मात्र उपलब्ध होत नाहीत याबद्दल

संबंधित जन माहिती अधिकारी श्री. एल.एल.वाघ यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. रंगनाथ गणपतराव भोसले यांनी केली.

श्री. वाघ यांच्या काळातील हा विषय आहे. आपण कार्यभार स्वीकारताना सन १९७६ ते १९८१ या काळातील सभेच्या इतिवृत्ताची कागदपत्रे आपल्याला मिळाली नाहीत. अपीलकर्त्यांना समक्ष बोलावून सर्व अभिलेख दाखविण्यात आले. माहिती नाकारण्याचा कोणताही उद्देश नाही, असे निवेदन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कळस श्री. व्ही.एस. चांदगुडे यांनी केले. ते रास्त असल्याचे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर श्री. आर.एम. साळुंके यांनी केले.

दरम्यान श्री. वाघ यांच्याकडून विहित मुदतीत व योग्य माहिती न मिळाल्याची तक्रार श्री. भोसले यांनी आयोगाकडे केली. त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडून आयोगाने खुलासा मागविला. विहित मुदतीत कागदपत्रे न दिल्याबद्दल श्री. भोसले यांनी दि. २८.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये तक्रार केली होती. त्याच दिवशी श्री. वाघ यांना 'कारणे दाखवा' नोटीस देण्यात आली. त्यांनी मुदतीत खुलासा सादर न केल्याने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर यांनी श्री. वाघ यांना एक वेतनवाढ तात्पुरती बंद करण्याची शास्ती केली. मात्र ग्रामपंचायतीची दप्तर तपासणी केली असता सन १९८१ ग्रामपंचायत मासिक सभेत प्रोसीडिंग आढळून येत नाही, असा अहवाल उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, यांनी आयोगाला सादर केला.

अर्ज न स्वीकारणे व माहिती देण्याबाबत केलेली कार्यवाही याविषयी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कळस श्री. एल.एल. वाघ यांनी तीन दिवसात आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री. वाघ यांनी दि. २९.११.२००८ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. ग्रामपंचायत कळस, येथे आपण जुलै २००५ ते दि. १८.३.२००६ अखेर ग्राम विकास अधिकारी म्हणून कार्यरत होतो. श्री. भोसले यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांबाबत आपल्याला उपलब्ध असलेले सर्व अभिलेख त्यांच्यासमोर तपासले. मिळालेल्या व न मिळालेल्या अभिलेखाची पूर्ण माहिती त्यांना दिली. त्यानंतर आपण आजारी पडल्याने वैद्यकीय रजेवर होतो. दि. १९.३.२००६ रोजी ग्रामसेवक पदाचा कार्यभार श्री. एन.पी.गायकवाड यांच्याकडे देऊन आपण कार्यमुक्त झालो. दरम्यानच्या काळात श्री. भोसले यांनी केलेल्या माहिती - मागणीच्या अर्जाबाबत आपल्याला काही माहिती नाही, तथापि आपल्याला जाणीवपूर्वक त्रास देऊन वरिष्ठ कार्यालयाकडे तक्रारी देऊन माझ्याकडे चार्ज नसतानादेखील स्थानिक, राजकीय पदाधिकारी

यांच्या सांगण्यावरुन माझी एक वेतनवाढ मे २००६ मध्ये तात्पुरती बंद करण्याची कारवाई केली आहे, असे श्री. वाघ यांनी या खुलाशात म्हटले आहे. संबंधित विषयात श्री. वाघ यांच्यावर एकदा कारवाई करण्यात आली आहे, हे लक्षात घेता त्याच विषयासाठी पुन्हा कारवाई न करता त्यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ११ .१२.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र सखाराम तापकीर,
मु.पो.कोरगांव - भिमा, ता.शिरुर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,
फ्रेंडस एज्युकेशन इन्स्टियूट, भिमा कोरेगाव, ता.शिरुर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६९१/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामचंद्र सखाराम तापकीर,
मु.पो.कोरगांव - भिमा, ता.शिरुर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे-१ श्री.डी.पी.शेंडकर

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक, फ्रेंडस एज्युकेशन इन्स्टियूट,
भिमा कोरेगाव, ता.शिरुर, जि.पुणे श्री.रा.रा.ढेरंगे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.०९.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२३.१०.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

फ्रेंडस एज्युकेशन इन्स्टिटयूट, कोरेगाव भिमा, ता.शिरूर, जि.पुणे या शाळेतील मुलांकडून घेतलेल्या शुल्काच्या जमाखर्चाची खरी माहिती जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, फ्रेंडस एज्युकेशन इन्स्टिटयूट, कोरेगाव भिमा, ता.शिरूर, जि.पुणे यांनी दिलेली नाही. विद्यार्थी संख्या ८५० असताना २३७ दाखविली जाते. अशा प्रकारे खोट्या नोंदी ठेवल्या जात आहेत व अनेक बेकायदेशीर बाबी संस्थेत चालू असल्यामुळे वस्तुस्थितीनुसार सत्य माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रामचंद्र सखाराम तापकीर यांनी केली.

श्री.तापकीर यांचे आरोप निराधार आहेत. संपूर्ण माहितीची ९६२ पाने त्यांना यापूर्वीच देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, फ्रेंडस एज्युकेशन इन्स्टिटयूट, कोरेगाव भिमा, ता.शिरूर, जि.पुणे श्री.राजाराम रामचंद्र ढेरंगे यांनी संबंधित माहितींच्या प्रतींसह निवेदन केले. श्री.तापकीर यांचा अर्ज आपल्याला प्राप्त झाल्यावर माहिती संस्था स्तरावरील असल्यामुळे आपण तो संस्थेकडे पाठविला, संस्थेने माहिती आपल्याकडे पाठविली व आपण ती अपीलकर्त्यास दिली. लेखा तपासणी अहवाल न दिल्याची तक्रार अपीलकर्त्याने केली. तेही देण्याचे आदेश संस्थेला देऊन पूर्तता केली, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.डी.पी.शेंडकर यांनी नमूद केले. आपल्याला ही सर्व माहिती मिळाली असल्याचे अपीलकर्ता श्री.रामचंद्र सखाराम तापकीर यांनी मान्य केले.

खोट्या नोंदी केल्या जाणे, विद्यार्थीसंख्या व शुल्क याबाबत बेकायदेशीर कार्यपध्दती अवलंबिणे याबाबतच्या अपीलकर्त्यांच्या तक्रारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विचारात घेता येणार नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे

पुणे
दि.३१.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विठ्ठल भिवाजी घोळवे
मु.पो.निंबोडी, ता.इंदापूर, जि.पुणे — **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
तहसील कार्यालय इंदापूर, ता.इंदापूर,जि.पुणे — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय इंदापूर, ता.इंदापूर,जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७१३/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विठ्ठल भिवाजी घोळवे
मु.पो.निंबोडी, ता.इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार, तहसील कार्यालय इंदापूर,
ता.इंदापूर,जि.पुणे श्री.एस.के.मोरे

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय इंदापूर,
ता.इंदापूर,जि.पुणे श्री.एच.एल.पाटील

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.१०.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२४.६.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०३.१२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.०१.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१७.११.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

दि.१४.९.२००५ पर्यंत आपल्याला पोलीस पाटील म्हणून नेमणुकीचा आदेश होता. त्यानंतर पुढील कालावधीसाठी नियुक्ती न दिल्याबद्दलची माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे यांनी आपल्याला दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.विठ्ठल भिवाजी घोळवे यांनी केली.

श्री.घोळवे यांना विहित मुदतीत माहिती देण्यात आली. पुन्हा त्याची प्रत सोबत आणली आहे. दर दोन महिन्यांकरिता पोलीस पाटीलपदी आपल्याला नियुक्ती मिळण्याची त्यांची मुख्य मागणी आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.एच.एल.पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.एस.के.मोरे यांनी नमूद केले.

श्री.घोळवे यांनी विहित मुदतीत दिलेल्या माहितीची व ती पाठविल्याच्या जावक बारनिशीमधील नोंदीची प्रत आयोगाला सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे

श्री.एस.के.मोरे यांनी श्री.घोळवे यांना पुनश्च माहिती देऊन संबंधित नोंदीच्या प्रती दि.२.१२.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केल्या.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२२.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री. बंडोपंत मायाप्पा ढेंबरे
मु.राजोबाचीवाडी, पो.माडग्याळ,
ता.जत, जिल्हा सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय जत, ता.जत, जिल्हा सांगली

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार
तहसील कार्यालय, जत, ता.जत, जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७४०/२००९ / सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२/१२/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०/१२/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २/२/२००९ |
| ५ | प्रथम अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२/३/२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती- मागणी अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.बंडोपंत मायाप्पा ढेंबरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दरम्यान अपीलकर्ता मयत झाल्याबाबतचा त्यांचा मृत्यू दाखला ग्रामसेवक, ग्रामपंचायत सोन्याळ, ता.जत, जिल्हा सांगली यांनी आयोगास सादर केला आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१८-१२-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. पांडुरंग सखाराम रूकडीकर
मु.पो. रुकडी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**

१) तहसीलदार हातकणंगले,
ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर

२) तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख, हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **१७४१/२००९/ कोल्हापूर** |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७-०९-२००९ |
| ३ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u> :-** सि. स. नं. १२५६ चे मूळ रेकॉर्ड मिळावे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. पांडुरंग सखाराम रुकडीकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपील केले नाही. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २३-१२-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय पोपटराव जगदाळे **अपीलकर्ता**
राजवैभव प्रतिष्ठान, औंध, ता.खटाव जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहायक महाव्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, **उत्तरवादी**
सातारा क्षेत्र,जीवन तारा, एल.आय.सी. भवन, कोरेगांव रोड, सातारा
**जन माहिती अधिकारी तथा** मुख्य व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र,
सातारा क्षेत्र,जीवन तारा, एल.आय.सी. भवन, कोरेगांव रोड, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **१७४२/२००९/ सातारा** |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०-०८-२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२-०९-२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ०९-१०-२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२-१०-२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय पोपटराव जगदाळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे ज्या सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निर्णयाविरुध्द अपील केले आहे, ते सार्वजनिक प्राधिकरण हे केंद्रीय माहिती आयोगाच्या कार्यकक्षेतील असल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२३-१२-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय पोपटराव जगदाळे
राजवैभव प्रतिष्ठान,
औंध, ता.खटाव जि.सातारा

**अपीलकर्ता**

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहायक महाव्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, सातारा क्षेत्र, जीवन तारा, एल.आय.सी. भवन, कोरेगांव रोड, सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्य व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, सातारा क्षेत्र, जीवन तारा, एल.आय.सी. भवन, कोरेगांव रोड, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **१७४३/२००९/ सातारा** |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८-०८-२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२-०९-२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ०९-१०-२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१२-१०-२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय पोपटराव जगदाळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे ज्या सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निर्णयाविरुध्द अपील केले आहे, ते सार्वजनिक प्राधिकरण हे केंद्रीय माहिती आयोगाच्या कार्यकक्षेतील असल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि. २३-१२-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री.निमराज पंढरीनाथ विसपुते
आर-,/१५, बी, स्वामी समर्थ सहकारी गृहरचना,
संस्था मर्यादित (अ), पाषाण, पुणे -२१

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप निबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर (४),
साखरसंकुल, शिवाजीनगर,
पुणे-५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सेक्रेटरी स्वामी समर्थ सहकारी गृहरचना संस्था (अ) मर्या.,
पाषाण, पुणे -२१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७५२ / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि.२७.०५.२००९ |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.०१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.०१.२००८ |
| ८ | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

विवेचन

अपीलकर्ता, श्री.निमराज पंढरीनाथ विसपुते यांच्या अपिलाचा समावेश दि.२७.०५.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये करण्यात आला होता.

तथापि, त्यामधील प्रपत्रामध्ये जन माहिती अधिकारी तथा सेक्रेटरी स्वामी समर्थ सहकारी गृहरचना संस्था (अ) मर्या., पाषाण, पुणे यांनी नमूद केल्याप्रमाणे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्र.५६६६/२००७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. ही बाब विचारात घेता सदरचे अपील दखलपात्र नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) नियंत्रक अधिकारी म्हणून सहकारी संस्थांची जी माहिती सहकार खात्याच्या संबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे, ती अर्जदारांना देणे बंधनकारक आहे. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), साखर संकुल, शिवाजीनगर पुणे-५ यांनी कार्यवाही करावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि.: ३०-१२-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेजीराव विठ्ठलराव नाईक निंबाळकर
'विराम' गोळीबार मैदान, फलटण, ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(महसूल),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, विभागीय आयुक्त,
पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय, विधान भवन, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८३/ ~~पुणे~~ सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(महसूल),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे श्री.सुभाष धर्माधिकारी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, विभागीय आयुक्त,
पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय, विधान भवन, पुणे श्री.दादाभाऊ जोशी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.८.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.१०.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१५.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१०.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

तलाठी व मंडल अधिकारी यांनी चुकीच्या नोंदी केल्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी केलेल्या अर्जानुसार कारवाई केली नाही. चौकशी करताना आपल्याला नोटिस काढली नाही अथवा आपला जबाब घेतला नाही, त्यामुळे एकतर्फी चौकशी करून दिलेली माहिती खोटी आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपीलकर्ता श्री.राजेजीराव विठ्ठलराव नाईक निंबाळकर यांनी केले.

श्री.नाईक निंबाळकर यांचा तक्रारी अर्ज उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, फलटण, ता.फलटण, जि.सातारा यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यांच्या अहवालाची प्रत व माहितीबाबतचे शुल्क श्री.नाईक निंबाळकर यांना कळविण्यात आले होते. परंतु त्यांनी त्यानुसार पूर्तता केली नाही व अहवाल प्राप्त करून घेतला नाही, असे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे श्री.दादाभाऊ जोशी व अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त(महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे श्री.सुभाष धर्माधिकारी यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. सदर अहवाल रजिस्टर्ड टपालाने अपीलकर्त्यास पाठविण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री.नाईक निंबाळकर याना संबंधित अहवालाच्या प्रती पाठविल्या व संबंधित संचिका अवलोकनासाठी उपलब्ध असल्याचे त्यांना कळविले, असे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे श्री.दादाभाऊ जोशी यांनी श्री.नाईक निंबाळकर यांना दि.११.१२.२००८ रोजी पाठविलेल्या प्रतींसह आयोगास अवगत केले. परंतु ही माहिती असत्य व बेकायदेशीर असल्याची तक्रार

श्री.नाईक निंबाळकर यांनी दि.२२.१२.२००८ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. परंतु त्यांची तक्रार प्रशासकीय कार्यवाहीच्या कायदेशीर बेकायदेशीरपणाबद्दल आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ही बाब येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१५.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.सुनिल भगवान थोरात
मु.पो.मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती आंबेगाव,जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती आंबेगाव,जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७१/ पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि.२०.०१.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.१२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.०३.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१५.०२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१०.०३.२००८ |
| ७ | माहिती-ग्रामसेवक श्री.किसन बबन मोरे यांचेवर काय कारवाई केली, या संदर्भातील कागदपत्रांच्या नकला मिळणेबाबत. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दिनांक २०.०१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये या अपीलाचा समावेश होता. त्यामधील प्रपत्रावर गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी गडबडीत आपली (अपीलकर्ता श्री.थोरात) सही घेतली आहे. सदर प्रपत्र फक्त विस्तार अधिकारी श्री.सोनवणे यांनीच लिहिले आहे. त्यामुळे ते आपल्याला मान्य नाही. सदर

अपिलावर सुनावणी घेण्यात यावी. असे श्री.थोरात यांनी त्यांचे दि. ६.०२.२००९ चे पत्रान्वये आयोगास अवगत केले होते. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत) व अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, आंबेगाव यांचेकडून आयोगाचे पत्र दि.१४.०५.२००९ च्या पत्रान्वये वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविण्यात आला होता. तो दि. ४.०६.२००९ चे पत्रान्वये प्राप्त झाला.

श्री.थोरात यांना त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे माहिती देण्यात आली होती. श्री.थोरात यांची मुख्य मागणी त्यांच्या वारसा हक्काने झालेल्या नोंदीबाबत आहे. श्री.थोरात व त्यांचे बंधू यांच्यातील अंतर्गत कौटुंबिक वादामुळे शौचालयाचा वापर श्री.थोरात यांना करुन देत नाहीत. तसेच त्यांचे वडील व भाऊ यांनी आपापसांत घर मिळकतीचे वाटप नोटरीसमोर केले आहे. परंतु नोंदणीकृत वाटपपत्र झालेले नाही. ते करुन मिळावे, अशी श्री.थोरात यांची मागणी आहे. सदर बाब ही त्यांच्या घरातील अंतर्गत बाब आहे. वास्तविक नोटरीकडील वाटपपत्राप्रमाणे ग्रामपंचायत दप्तरी नोंदी करण्यात आल्या आहेत. अहवालात नमूद केल्याप्रमाणे नजर चुकीने राहिलेली शौचालयाची नोंद सन २००६ मध्येच करुन दिलेली आहे. परंतु केवळ कौटुंबिक वादातून श्री.थोरात यांना शौचालयाचा वापर करुन दिला जात नाही म्हणून ते सर्व संबंधित कार्यालयाकडे तक्रार अर्ज व माहिती अधिकारात अर्ज करीत आहेत.

दि.२०.०१.२००९ चे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये श्री.थोरात यांना त्यांनी माहिती अधिकारात मागितलेली माहिती त्यांना पूर्णपणे देण्यात आली आहे किंवा नाही याबाबत अनेकांच्या उपस्थितीत विचारले व माहिती दिल्याबाबत खात्रीही दिली होती व मला माहिती मिळाली आहे. परंतु 'माझ्या शौचालयाचा वापर मला करुन देण्यासाठी तुम्ही भावावर दबाव आणावा व ग्रामसेवकावर कारवाई करावी', असे त्यांचे म्हणणे होते. सदर बाब कार्यालयीन कामाकाजाचा भाग नसल्याबाबत त्यांना कल्पना दिल्यावर त्यांनी स्वतः अपील निर्गत प्रपत्रावर वाचून सही केली व त्यानंतरही प्रपत्र सादर करताना तेथील अधिकारी यांनी त्यांना समक्ष विचारुनच अहवाल स्वीकारला आहे. त्यामुळे लिहिण्याची संधी दिली नाही. हे त्यांचे म्हणणे चुकीचे आहे, असे जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती आंबेगाव, घोडेगाव, जि.पुणे श्री.एस.डी.सोनवणे यांनी

अहवालामध्ये नमूद केले आहे. यानुसार श्री.थोरात यांना माहिती देण्यात आल्याचे दिसते. सबब त्यांच्या तक्रारीत तथ्य आढळत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : ३१/१२/२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम ,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ.
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री.महावीर सुरगोंडा पाटील ..... **अपीलकर्ता**
मु.पो.ब्रम्हनाळ, ता.पलूस,
जिल्हा सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** पोलीस अधीक्षक, ..... **उत्तरवादी**
सांगली

**जन माहिती अधिकारी तथा** उप विभागीय पोलीस अधिकारी,
तासगांव उप विभाग, जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७८/२००९ सांगली |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br>आमची बदनामी करणाऱ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करणेबाबत. | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री.महावीर सुरगोंडा पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ११-१२-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. राजेंद्र रघुनाथ शिंदे
प्लॉट ५६ बी, १, राव कॉलनी,
तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** जिल्हा प्रकल्प अधिकारी (नगरपालिका शाखा),
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८८२/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०१.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२८.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.०२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.०३.२००८ |
| ८ | माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमा त या अपीलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता अनुपस्थित होते.

सदर अपिलासोबत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांची मूळ मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराप्रमाणे चौकशी पूर्ण झाली असल्यास चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्त्यास पुरवून याबाबतचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी (नगरपालिका शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दिनांक : ३०/१२/२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मारूती धोंडिबा ढोबळे
मु.पो.निरगुडसर, ता.आंबेगाव, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती आंबेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे (अ.क्र.१८८६) — उत्तरवादी

(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी, पुणे (अ.क्र.१८९४)

(३)**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे (अ.क्र.१८९५)

(४)**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, आंबेगाव,
ता.आंबेगाव, जि.पुणे (अ.क्र.१८९६)

(१)**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
निरगुडसर ग्रामपंचायत, ता.आंबेगाव, जि.पुणे

(२)**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
जुन्नर उपविभाग, खेड, ता.खेड, जि.पुणे

(३)**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

(४)**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, आंबेगाव,
ता.आंबेगाव, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८८६+१८९४+१८९५+१८९६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.६.२००९ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.मारूती धोंडिबा ढोबळे
मु.पो.निरगुडसर, ता.आंबेगाव, जि.पुणे

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती आंबेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.चं.ल. वसईकर
(३)**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे श्री.प्रकाश कदम
(४)**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, आंबेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.प्रशांत पाटील
(१)**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
निरगुडसर ग्रामपंचायत, ता.आंबेगाव, जि.पुणे श्रीमती एस.आर.आवटे
(२)**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
जुन्नर उपविभाग, खेड, ता.खेड, जि.पुणे डॉ.किरण महाजन
(३)**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.संजीव देशमुख
(४)**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, आंबेगाव,
ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.डी.एच.पिंगळे

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १८८६ | दि.१९.११.२००७ | दि. १४.१२.२००७ | दि. १०.१.२००८ | -- |
| १८९४ | दि.२६.१०.२००६ | दि.८.११.२००६ | दि.१०.१.२००८ | दि.१८.१.२००८ |
| १८९५ | दि.१.१२.२००७ | दि.१२.१२.२००७ | दि.१०.१.२००८ | दि.८.२.२००८ |
| १८९६ | दि.१९.११.२००७ | दि.१७.१२.२००७ | दि.९.१.२००८ | -- |
| ५ | माहिती-मागणीच्या अर्जांच्या (जोडपत्र अ) प्रती सोबत जोडल्या आहेत. | | | |

## सुधारित आदेश

वाचा::आयोगाचे आदेश दि.१५.१२.२००९

(१) वरील आदेशामध्ये अपील क्र.१८८६ असे नमूद केलेले आहे. ते अपील क्र. १८८६+१८९४+१८९५+१८९६ / पुणे असे वाचणेत यावे.

(२) त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यामध्ये झालेले बदल व उपस्थितीमधील बदल वाचण्यात यावेत.

(३)तसेच अपीलकर्ता यांचे नाव श्री.मारूती धोंडिबा ढवळे असे चुकून टंकलिखित करण्यात आले आहे ते श्री.मारूती धोंडिबा ढोबळे असे वाचण्यात यावे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१५.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मारूती धोंडिबा ढवळे
मु.पो.निरगुडसर, ता.आंबेगाव, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती आंबेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
निरगुडसर ग्रामपंचायत, ता.आंबेगाव, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८८६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मारूती धोंडिबा ढवळे
मु.पो.निरगुडसर, ता.आंबेगाव, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती आंबेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.चं.ल. वसईकर

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
निरगुडसर ग्रामपंचायत, ता.आंबेगाव, जि.पुणे श्रीमती एस.आर.आवटे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि. ३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१९.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सार्वजनिक रस्त्यामध्ये इमारत गाळे बांधून गायरान जमिनीत केलेले अतिक्रमण काढण्यासाठी आपण आतापर्यंत जिल्हाधिकाऱ्यांसह विविध अधिकाऱ्यांकडे १४ तक्रारी अर्ज दिले. परंतु गेल्या चार वर्षात अतिक्रमण काढण्यात आले नाही व त्याबाबतची माहितीही दिली जात नाही. आपण कळविलेले शुल्क भरले नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. परंतु आपल्याला शुल्क कळविले गेले नाही. अतिक्रमणाबाबत झालेली चौकशीही पूर्ण व योग्यप्रकारे झाली नसून काही कागदपत्रे गहाळ करण्यात आली आहेत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मारूती धोंडिबा ढोबळे यांनी केली.

श्री.ढोबळे यांनी तहसीलदारांकडे माहिती मागण्याबाबत केलेल्या अर्जानुसार विहित मुदतीत शुल्काबाबत कळविले. त्यांनी शुल्क न भरल्यामुळे माहिती दिली नाही. तसेच याच विषयासंदर्भात त्यांनी अनेक अर्ज विविध पातळ्यांवर केले असून संबंधित तक्रारींच्या अनुषंगाने सर्व माहिती त्यांना देण्यात आलेली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, निरगुडसर ग्रामपंचायत, ता.आंबेगाव, जि.पुणे श्रीमती एस.आर.आवटे यांनी केले.

अतिक्रमणाबाबत श्री.ढोबळे यांची तक्रार असून त्याबाबतच्या कार्यवाहीची माहिती त्यांना देण्यात आली आहे. तसेच अतिक्रमण होऊ नये याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना ग्रामपंचायत,

निरगुडसर यांना देण्यात आल्या आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, आंबेगाव श्री.चं.ल.वसईकर यांनी नमूद केले.

तहसीलदार, आंबेगाव यांनी श्री.ढोबळे यांच्या मूळ तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती दि.३०.६.२००९ पर्यंत अपीलकर्त्यास द्यावी असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तहसीलदार, आंबेगाव यांनी स्वतः स्थळपहाणी करून उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड यांना अहवाल सादर केला. अतिक्रमणाच्या तक्रारीच्या अनुषंगाने ग्रामपंचायतीने नगरभूमापन यांच्याकडून मोजणी करून रस्त्याच्या हद्दी कायम करून घ्याव्यात. अतिक्रमण असल्याचे त्यावेळी सिध्द झाल्यास त्यावर ग्रामविकास अधिकारी व ग्रामपंचायत यांनी संयुक्तरीत्या कार्यवाही करावी, असे ठरविण्यात आले. याबाबत ग्रामपंचायतीची विशेष सभाही आयोजित करण्यात आली होती. नंतर चौकशी करता सरकारी गायरान जमिनीत अतिक्रमण झाल्याचे सिध्द होत नाही असे तहसीलदार, आंबेगाव यांनी अहवालामध्ये नमूद कले आहे, असा अहवाल उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड श्री.किरण महाजन यांनी दि.२.७.२००९च्या पत्रान्वये स्थळ पाहणीचा पंचनामा, ग्रामपंचायतीच्या सभेचे इतिवृत्त आदि कागदपत्रांच्या प्रतींसह आयोगाला सादर केला. ते लक्षात घेता अपीलकर्त्याची अतिक्रमण काढण्याची मूळ तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नसूनही त्या अनुषंगाने कार्यवाही करून माहिती देण्यात आली आहे.

याच विषयासंबंधी श्री.ढोबळे यांनी जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती आंबेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे यांच्याकडे माहिती मागितली होती. ग्रामपंचायतीने वसूल केलेले पैसे महसूल खात्याचे असून ते महसूल खात्यास द्यावे व गायरान जागेवरील अतिक्रमण काढावे, अशी मागणी श्री.ढोबळे यांचे प्रतिनिधी ॲड.बाळासाहेब महादेव लिंभोडे यांनी केली. कळविलेले शुल्क मनीऑर्डरने पाठविले होते. परंतु ती मनीऑर्डर न स्वीकारता परत आली, असेही त्यांनी नमूद केले.

कळविलेले शुल्क श्री.ढोबळे यांनी भरले नाही, तरीही अतिक्रमणाबाबतच्या नोंदीच्या उताऱ्यासह सर्व माहिती विहित मुदतीत दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, निरगुडसर ग्रामपंचायत, ता.आंबेगाव, जि.पुणे श्रीमती एस.आर.आवटे यांनी केले. श्री.ढोबळे यांच्या मूळ अर्जानुसार माहिती दिली असूनही त्यांनी केलेले अपील प्रलंबित असतानाच राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी अपील केले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती आंबेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.चं.ल.वसईकर यांनी नमूद केले. श्री.ढोबळे यांनी केलेल्या मूळ तक्रारीच्या अनुषंगाने सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांना देण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. गायरानातील अतिक्रमण ग्रामपंचायतीने काढावे, या एकाच मागणीबाबत गटविकास अधिकारी व अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे श्री.ढोबळे यांनी वेळोवेळी अर्ज केले आहेत. आपल्या कार्यालयाने केलेल्या चौकशी अहवालाच्या व ग्रामपंचायतीने केलेल्या कार्यवाहीच्या माहितीच्या सर्व कागदपत्रांच्या प्रती दि.२३.६.२००९ च्या पत्रान्वये श्री.ढोबळे यांना पाठविण्यात आल्या असा अहवाल गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आंबेगाव श्री.राहुल शांताराम काळभोर यांनी आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१५.१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम ,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विलास आकाराम खोत
कर्मवीर नगर, पोलीस लाईनचे पाठीमागे,
इस्लामपूर, जिल्हा सांगली ..... **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय वाळवा-इस्लामपूर,
जिल्हा सांगली ..... **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय वाळवा-इस्लामपूर,
जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८८८/२००९ सांगली |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** मौजे ऐतवडे खुर्द येथील चावडीवर माहिती अधिकाराचे फलक न लावणे व हालचाल नोंदवहीबाबतची माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. विलास आकाराम खोत यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये आवश्यक फलकाबाबतची वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी आठ दिवसांत आयोगास अवगत करावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १४-१२-२००९.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ